
# ८४ वा
## वार्षिक अहवाल
## सन २०२३-२४



संस्थापक
दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह
बँक लि. सातारा










अमृत महोत्सवी बँक
दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सातारा

ऑडिट वर्ग "अ"

# दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा

| www.rayatsevakbank.co.in | ho@rsbs.co.in ग्राहक सेवा क्रं. १८०० २३३ ५६८५

# ८४ वा वार्षिक अहवाल सन २०२३-२०२४

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

रयत शिक्षण संस्था व आपल्या बँकेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ तीर्थरुप अण्णा यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करून बँकेच्या ८४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस सहभागी झालेल्या सर्व सभासदांचे संचालक मंडळाच्या वतीने मी हार्दिक स्वागत करतो.

आधुनिक महाराष्ट्राचे शिक्षण क्षेत्रात बहुमोल योगदान देणारी व गोरगरीब, दीन दुबळ्या जनतेच्या उद्धारासाठी व शैक्षणिक विकासासाठी रयत शिक्षण संस्थेचे व आपल्या बँकेचे संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ ती.अण्णा यांनी दि.०४ ऑक्टोबर १९१९ रोजी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेतील सेवकांच्या आर्थिक अडचणींचे निवारण करणेसाठी कर्मवीर अण्णांनी दिनांक १६ ऑगस्ट १९४० रोजी दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटीची स्थापना केली. या सोसायटीचे दिनांक २१/१०/१९६९ रोजी बँकेत रूपांतर झाले. दिनांक १२/०९/१९८६ रोजी बँकेस रिझर्व्ह बँकेचे लायसन्स मिळाले आहे.

शासकीय लेखापरिक्षक यांनी अहवाल वर्षात बँकेस एकूण १०० पैकी ८०.४० गुण देऊन लेखापरीक्षणा मध्ये वर्ग 'अ' दिलेला आहे. रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार बँक FSWM म्हणजेच **Financially Sound and Well Managed Bank** या सदराखाली आहे. ही निश्चितच आपणांसाठी अभिमानाची बाब आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण १४.९९% असून गतवर्षी ते १४.९२% होते. त्यात ०.०७% इतकी वाढ झाली आहे. बँकेचे खेळते भाग भांडवल रु.१६९८.५४ कोटी असून गतवर्षी ते रु.१५४०.०८ कोटी होते त्यात रूपये १५८.४६ कोटींनी वाढ झाली आहे.

रयत शिक्षण संस्थेतील सेवकांच्या शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी अहोरात्र झटणाऱ्या रयत सेवकांच्या आर्थिक गरजांची पूर्तता करून त्यांना सक्षम बनविण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या व सभासद हिताच्या दृष्टीने पारदर्शक कारभार करणाऱ्या सभासदांच्या बँकेचा सन् २०२३-२४ या आर्थिक वर्षातील अहवाल सादर करताना मला आत्यंतिक आनंद होत आहे.

## संचालक मंडळाने घेतलेले धोरणात्मक निर्णय

### गृहसमृध्दी कर्ज योजनेबाबत :-

आपल्या बँकेच्या सभासदांकरिता दि.०१/०२/२०२२ पासून 'गृहसमृध्दी कर्ज' योजना सुरु केलेली आहे. तसेच दि.०१/०८/२०२४ पासून गृहसमृध्दी योजनेअंतर्गत 'रूफ टॉप सोलर पॅनेल' याचाही समावेश करण्यात आलेला असून या खरेदी करिता कर्जाची मर्यादा ही रू.३ लाख व हप्त्यांची संख्या ३६ इतकी करण्यात आलेली आहे.

### सेव्हिंग्ज ठेव ओव्हरड्राफ्ट कर्ज योजनेबाबत :-

रयत शिक्षण संस्थेत सेवेत असणाऱ्या व ज्या सेवकांचे पगार आपल्या बँकेत होतात अशा सेवकांची आर्थिक अडचण दूर होणाच्या दृष्टीने दि.०१/१०/२०१४ पासून सेव्हिंग्ज ठेव ओव्हरड्राफ्ट कर्ज योजना सुरु केलेली आहे.

दि.१३/०६/२०२४ पासून या कर्जाची मर्यादा ही रू. १ लाख वरून रू. २ लाख व हप्ते १२ ऐवजी १० करण्यात आलेले आहेत.

अमृत महोत्सवी बँक
दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सातारा

बुक-पोस्ट

प्रति
मा. श्री. / श्रीमती ____________________

____________________

____________________


■ प्रकाशक :

**मा.श्री. राजेंद्र संपतराव शिर्के**
चेअरमन
दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा


If not delivered please return to


■ प्रेषक :

**मा.श्री. भास्कर बाबुराव कणसे**
मुख्य कार्यकारी अधिकारी
दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा
५२३ ब, अण्णासाहेब कल्याणी विद्यालय परिसर,
कॅम्प, सदरबझार, सातारा - ४१५ ००१.
फोन नं.: (०२१६२) २३१३१३/२३१३१४/२३१८३५
ग्राहक क्रमांक : १८०० २३३ ५६८५

: The Rayat Sevak Co-Op. Bank Ltd., Satara
Website : www.rayatsevakbank.co.in
E-mail : ho@rsbs.co.in



■ मुद्रक :

**डी.एस. प्रिंटर्स, सातारा.**
मोबा.: ९५५२५१६९६९




# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# विद्यार्थी विकास विभाग

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्

**SHIVAJI**
UNIVERSITY KOLHAPUR

## शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी योजना

- ☐ ही योजना शिवाजी विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालये तसेच विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी लागू केली आहे.
- ☐ या योजनेअंतर्गत विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचा मृत्यु झाल्यास वारसास रु. 1,50,000/- इतका निधी दिला जातो.
- ☐ विद्यार्थ्यांच्या पालकांचा मृत्यु झाल्यास रु. 75,000/- इतका निधी दिला जातो.
- ☐ विद्यार्थी/ पालक / शिक्षक/ प्रशासकीय कर्मचारी यांचे हात / पाय /डोळे पुर्ण निकामी झाल्यास रु. 25,000/- ते रु. 1,50,000/- पर्यंत निधी दिला जातो.
- ☐ योजनेसाठी विद्यार्थ्यांच्या प्रवेशावेळी रु. 50/- इतके शुल्क आकारले जाते.
- ☐ शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या कडून स्वतंत्रपणे अनुक्रमे रु. 200/- व रु. 100/- इतके शुल्क घेतले जाते.
- ☐ योजनेची अधिक माहिती शिवाजी विद्यापीठ www.unishivaji.ac.in-Student-Students' Development - Department of Students' Development-Kalyan Nidhi Yojana या ठिकाणी उपलब्ध आहे. तसेच आवश्यकता असल्यास विद्यार्थी विकास विभागामध्ये 0231-2609175, टोल फ्री क्रमांक 18002334871 किंवा ई-मेल dsw@unishivaji.ac.in च्या माध्यामातून संपर्क साधावा.

बेटी बचाओ... बेटी पढाओ..!

संचालक,
विद्यार्थी विकास

Donate Organs